| PUBLICATION | EDITION | DATE |
|---|---|---|
| The Goan Vartha | Goa | 22/05/2017 |

उद्योग वार्ता

# कामधेनुकडून इंटरलॉक स्टील सादर

**पणजी :** पायाभूत विकासाच्या विश्वामध्ये एका नव्या आयामाची भर घालत, कामधेनु लिमिटेड यांनी या उद्योगाच्या वाढीमध्ये एका नवा मैलाचा टप्पा समाविष्ट केला असून बाजारपेठेत उच्च दर्जाचे इंटरलॉक स्टील सादर केले आहे. औद्योगिक उत्पादन निर्मितीमध्ये प्रागतिक मॉडेलवर काम करुन कंपनीने हे साध्य केले आहे. अतुलनीय शक्ती, परिपूर्ण क्षमता, अचूक भौतिक आणि रासायनिक गुणधर्म, प्रगत डबल रिब डिझाईन इ. कामधेनु नेक्स्ट इंटरलॉक स्टीलचे काही गुणधर्म आहेत जे कंपनीद्वारे भरपूर संशोधन आणि विकास केल्यानंतर अस्तित्वात आले आहे. हे भव्य उत्पादन रिएनफोर्समेंट संरचनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अन्य सामान्य स्टील बार्सच्या तुलनेत २.५ पट उत्तम आणि भक्कम इंटरलॉक पकड देते.

हे पुढच्या पिढीचे इंटरलॉक स्टील भूकंपांमध्ये उच्च संरचनांना अधिकतम सुरक्षितता देवून त्यांना पूर्णपणे भूकंप रोधक बनवते. हा उत्तम प्रकारे डिझाईन केलेला स्टील बारमध्ये दोन गोलाकार रिब्ज असतात जे स्टील आणि क्रॉंक्रीट इंटरलॉकचा भक्कमपणा द्विगुणित करतात.

कामधेनु भरपूर संशोधनाच्या अंती तयार झाले आहे. जेणेकरुन पुढच्या पिढीतील संरचनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची ताकद आणि भक्कमपणा मिळेल, असे कामधेनु लिमिटेडचे संचालक सुनिल अगरवाल यांनी सांगितले.